

किर्लोस्कर बंधु लिमिटेड. किर्लोस्करवाडी


# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ९ नोव्हेंबर, १९४९ अंक ४३



श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**सायकलींचा नवा कारखाना**—लंडन येथील टॅयूब इन्व्हेस्टमेंट्स लि. ह्या कंपनीच्या सहकार्यानें मद्रास येथील एका देशी कंपनीनें सायकलींचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या संयुक्त कंपनीचें भांडवल ७० लाख रुपये राहील. त्यापैकी ४९ टक्के परदेशी कंपनी पुरविणार आहे. प्रत्यक्ष उत्पादनाला सुमारें सहा महिन्यांनीं प्रारंभ होणार आहे. कारखान्यांत दरवर्षी १ लाख सायकली तयार होतील असा अंदाज आहे. कारखान्यासाठी मद्रास-जवळ ६४ एकर जागा मिळविण्यांत आली आहे.

**कापड गिरण्यांसंबंधीं कांहीं आकडे**—मुंबई बेटांतील गिरण्यांतून काम करणाऱ्या मजुरांची दैनिक सरासरी संख्या कमी झाल्याचें आढळून आलें आहे. ३१ ऑगस्ट १९४८ ह्या दिवशीं पुऱ्या झालेल्या वर्षांत ही सरासरी १,२२,७९१ होती. मागील वर्षी ती १,२४,३७१ होती. उलटपक्षी, गिरण्यांतील मागांच्या व चात्यांच्या संख्येंत मात्र वाढ झाली आहे. चात्यांची संख्या २८,५०,८७० होती ती २८,६६,१५० झाली आहे. मागांची संख्या ६५,८३६ होती ती ६५,८८० झाली आहे. त्याचप्रमाणें कापडाचा खपही वाढला आहे.

**भारतांतील रोजगारी कमी होऊं लागली**—सप्टेंबर महिना-अखेर हिंदमधील बेकारांची संख्या अधिकच वाढत असल्याचें आढळून आलें आहे. ह्या महिन्यांत एकूण ८३,०३३ लोकांनीं नोकऱ्या मिळण्यासाठी आपलीं नांवें उद्योग-विनिमय केंद्रांतून नोंदविलीं. त्यांपैकी फक्त १८,२४६ लोकांना कामें देण्यांत आलीं. ऑगस्ट महिन्यांत २०, २२३ लोकांना नोकऱ्या देण्यांत आल्या होत्या. सरकारी खात्यांतून करण्यांत येणारी कपात, गिरण्यांची तात्पुरती टाळेबंदी आणि औद्योगिक विस्ताराच्या योजनांची तहकुबी इत्यादि कारणांमुळें बेकारी वाढली आहे.

**हिंदचा परदेशांशीं व्यापार**—एप्रिल १९४९ पासून सप्टेंबर १९४९ अखेरचे हिंदच्या आयात-निर्यातीचे आंकडे पुढें दिले आहेत त्यावरून निर्यातीपेक्षा आयात अधिक झाली तरी तफावतीची प्रतिकूलता कमी झाल्याचें दिसून येते. आंकडे लाख रुपयांचे आहेत.

| महिना | एकूण आयात | एकूण निर्यात (पुनर्निर्यात धरून) | व्यापारांतील तोल |
|---|---|---|---|
| एप्रिल | ५०,०५ | ३४,१५ | –१५,९० |
| मे | ६२,६६ | २८,७८ | –३३,८८ |
| जून | ५८,४८ | २९,६२ | –२८,८६ |
| जुलै | ५५,४९ | ३०,९० | –२४,५९ |
| ऑगस्ट | ४९,४८ | ३४,७५ | –१४,७३ |
| सप्टेंबर | ३७,४६ | ३४,१९ | –३,९७ |

**मिठाची आयात आणि सरकारी धोरण**—पाकिस्ताननें आपल्या चलनाच्या अवमूल्यनासंबंधीं जें धोरण स्वीकारलें आहे, तें लक्षांत घेऊन पाकिस्तानकडून मिठाची आयात करावयाची नाहीं असें हिंद सरकारच्या मीठ सल्लागार समितीनें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें, मिठाचें उत्पादन वाढवून १९५१ अखेर ह्या वस्तू-बाबत देश स्वावलंबी करावा असाहि निर्णय समितीनें घेतला आहे.

**डच विमान कंपनीचीं तीस वर्षें पुरीं झालीं**—जगांतील सर्वांत जुनी विमान वहातूक कंपनी म्हणून के. एल. एम्. ही डच कंपनी प्रसिद्ध आहे. ७ ऑक्टोबर १९१९ ह्या दिवशीं ती स्थापन करण्यांत आली. आज ह्या कंपनीचीं १२० विमानें सात मोठ्या मार्गांवर वहातूक करीत आहेत. ह्या मार्गांची लांबी ८०,००० मैल असून ५४ देशांतील १०० शहरें त्यांनीं एकमेकांशीं जोडलीं आहेत. १९४८ मध्यें कंपनीनें ६,२२,६३० प्रवासी लोकांची वहातुक केली.

**वांशिक श्रेष्ठता शिकविणें मानवलें नाहीं**—मि. जॉर्ज आर्मस्ट्रॉंग ह्या अमेरिकन लक्षाधीशानें जेफरसन मिलिटरी ॲकॅडमी ह्या संस्थेला ५,००,००,००० डॉलर्सची देणगी देऊं केली होती. अँग्लो-सॅक्सन आणि दाक्षिण अमेरिकेंतील लोक श्रेष्ठ वंशाचे आहेत अशी शिकवण संस्थेनें दिली पाहिजे, ही अट देणगी देणाऱ्यानें घातली होती. संस्थेच्या अध्यक्षांनीं देणगीसंबंधानें बोलतांना असें सांगितलें कीं, ह्या अटीवर देणगी स्वीकारण्याइतकी संस्थेला पैशाची तीव्र जरुरी नाहीं. ह्या अटीवर देणगी स्वीकारण्यापेक्षां आम्ही संस्थाच बंद करूं.

**पडून असलेला पैसा बाहेर काढण्याचे प्रयत्न ?**—देशांत रिकामा पडून असलेला पैसा बाहेर काढण्यासाठी म्हणून हिंद सरकार बेअरर बॉंडस काढण्याच्या विचारांत आहे असें समजतें. ह्या बॉंडसवर प्राप्तीचा कर घेण्यांत येणार नाहीं आणि ते निगोशिएबल रहातील. व्याज एक टक्का देण्यांत येईल. अशा बॉंडसची एक योजना तयार करण्याची सूचना रिझर्व्ह बँकेला करण्यांत आली असल्याची वार्ता आहे.

**११४ दिवसांत वीस मजली इमारत**—मास्को शहरांत नवीन इमारती फार झपाट्यानें बांधल्या जात आहेत असें समजतें. २० मजली इमारत पुरी करण्यास तेथील बांधकाम करणारांना सरासरी ११४ दिवस पुरतात. आणखी चार वर्षांत, विटा रचून भिंती उभारण्याची पद्धत मागें पडेल असा अंदाज सोव्हिएट तंत्रज्ञांनीं केला आहे. तयार भिंती आणि गाळे वापरून, इमारत पुरी करण्याचा सरासरी काळ ३० दिवसांवर आणता येईल अशी त्यांची अपेक्षा आहे.

**अंध गायक शिक्षक म्हणून चालतील**—आंधळ्या गायननिपुणांना प्राथमिक आणि दुय्यम शाळांतून गायन शिक्षकाच्या नोकऱ्या देण्यास हरकत नाहीं, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. आंधळेपणा कार्यक्षमतेंत अडथळा आणीत नसला पाहिजे आणि शिक्षणाला योग्य ती पदवी पाहिजे, एवढ्याच अटी ठेवण्यांत आल्या आहेत.

**सर्वोत्कृष्ट रेशमाचे किडे**—अझर बैजनमधील एका रशिअन शास्त्रज्ञानें एका नवीन जातीच्या रेशमाच्या किड्यांची पैदास केल्याचें वृत्त आहे. हा किडा आपली प्रजा इतर जातीच्या रेशमाच्या किड्यांपेक्षा अधिक त्वरेनें वाढवितो. त्याचे कोष एकाच आकाराचे आणि रंगाचे असतात. शिवाय 'बगदाद' जातीच्या किड्यापेक्षा तो दुप्पट अधिक रेशीम निर्माण करतो.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

# अर्थ

बुधवार, ता. ९ नोव्हेंबर, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपनी कायद्यांत नियोजित दुरुस्ती

(१)

### मॅनेजिंग एजंटांच्या अधिकारावर कडक निर्बंध

हिंदी कंपनी कायद्यामध्यें १९३६ सालीं बऱ्याच दुरुस्त्या करण्यांत आल्या. त्यांची अंमलबजावणी आतां सुमारें १८ वर्षें चालू आहे. युद्धकाळांत आणि त्यानंतरहि हिंदी व्यवसाय व उद्योगधंदे ह्यांत पुष्कळच वाढ झाली आहे. मूळ हिंदी कंपनी कायदा इंग्लंडमधील कंपनी कायद्यावर आधारलेला आहे, परंतु इंग्लिश कायद्यांतहि कोहिन कमिटीच्या शिफारसीनुसार बरेच बदल करण्यांत आलेले आहेत. तेव्हां, हिंदी कंपनी कायद्याचीहि तपशीलवार छाननी करून त्यांत योग्य त्या सुधारणा करणें आतां आवश्यक झालें आहे. सबंध कायद्यांत आमूलाग्र दुरुस्ती करण्याचा सरकारचा विचार नसून, तूर्त तातडीच्या सुधारणा हातीं घेण्याचा त्याचा मर्यादित उद्देश आहे. मुंबईचे सॉलिसिटर श्री. त्रिकमदास द्वारकादास आणि मद्रासचे ॲडव्होकेट श्री. व्ही. के. तिरुवेंकटचारी ह्या दोन तज्ज्ञांकडे मध्यवर्ती सरकारनें कंपनी कायद्यांत सद्यःस्थिति लक्षांत घेऊन दुरुस्त्या सुचविण्याचें काम सोपविलें. त्यांच्या शिफारसींचा हिंद सरकारनें विचार करून स्वतःच्या कांहीं महत्त्वाच्या सूचना आपल्या व्यापार खात्याच्या एका मेमोरँडम द्वारा प्रसिद्ध केल्या आहेत. लिमिटेड कंपन्या, त्यांचे मॅनेजिंग एजंट, डायरेक्टर, इत्यादींस त्या जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या वाटतीलच; भागीदारांचे हितसंबंध सुरक्षित राहून पैसे गुंतविणारांचे मनांत विश्वास निर्माण व्हावा, हा कंपनी कायद्यांतील दुरुस्तीचा एक महत्त्वाचा उद्देश असल्या कारणानें पैसे गुंतविणाऱ्या सामान्य लोकांनाहि प्रस्तुत विवेचन उपयुक्त होईल. सरकारच्या व्यापारी खात्याच्या सूचना येथें तपशीलवार समजावून सांगितल्या आहेत. मॅनेजिंग एजन्सी पद्धतीमधील दोष नष्ट करण्याचा हेतु ह्या दुरुस्त्यांमुळें यशस्वी होण्याचा संभव किती व त्यांचे व्यवहारांत अडचणी निर्माण होऊन कंपन्यांचे कारभारांतील लवचीकपणा नष्ट होण्याचा संभव किती, हें इतक्यांत सांगतां येणार नाहीं. एवढें मात्र खरें, कीं कंपन्यांच्या व्यवहारांतील नीतिमत्ता कमी झाली असून तिचेवरील खरी उपाययोजना व्यापक, अवघड आणि दीर्घकालीन आहे; तेव्हां तातडीचा प्रभावी उपाय ह्या दृष्टीनेंच प्रस्तुत दुरुस्त्यांकडे पाहिलें पाहिजे. डायरेक्टरांवरील जबाबदारी पुष्कळच वाढविल्यानें, ज्यांचा कंपन्यांच्या प्रत्यक्ष व्यवहाराशीं संबंध नाहीं अशा गृहस्थांना ती पत्करावी तरी लागेल किंवा आपली शोभेची जागा सोडावी तरी लागेल. डायरेक्टर पद हें एखाद्या शैक्षणिक संस्थेच्या नियामक मंडळावरील जागेसारखें नसून, तें प्रत्यक्ष व्यवसायांतील हितसंबंधी लोकांनींच पत्करण्यालायक जबाबदारीचें स्थान आहे, ही गोष्ट आतां सुस्पष्ट झाली आहे.

मॅनेजिंग एजन्सीच्या विरुद्ध बऱ्याच तक्रारी ऐकूं येतात. त्यांतील प्रमुख अशा:—(१) मॅनेजिंग एजंटांनीं कंपन्यांच्या देखरेखीखालीं काम करावें असा संकेत आहे. परंतु, पुष्कळ ठिकाणीं मॅनेजिंग एजंटांसच निर्णायक अधिकार असतात. डायरेक्टर हे त्यांचेच हस्तक असून मॅनेजिंग एजंटांविरुद्ध त्यांचें कांहींच चालत नाहीं. (२) स्वतःच्या हिताच्या दृष्टीनेंच केवळ मॅनेजिंग एजंट कंपन्या चालवितात; भागीदारांच्या हिताकडे पूर्णपणें दुर्लक्ष्य केलें जातें. (३) कंपनीच्या मिळकतीपैकीं असमर्थनीय एवढा मोठा भाग मॅनेजिंग एजंट हे घेतात; भागीदारांच्या वाट्यास आला तर फारच थोडा भाग येतो.

औद्योगिक व व्यापारी उपक्रमांशीं मॅनेजिंग एजन्सी पद्धति निगडित आहे. तिचेकडे पैसे गुंतविणारे व ग्राहक ह्यांच्या दृष्टीनें सध्यापेक्षा जास्त प्रमाणांत पाहिलें पाहिजे. १९३६ च्या कंपनी कायद्यांत मॅनेजिंग एजंटांवर जीं बंधनें घातलेलीं आहेत, तीं आणखी आवळण्याची आवश्यकता सरकारास पटली आहे. म्हणून, त्यानें खालील दुरुस्त्या सुचवून त्यांवर मतें मागितलीं आहेत:—

(१) ज्या कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी असेल, त्यांच्या धंद्यासारखाच धंदा मॅनेजिंग एजंटांनीं करूं नये. (२) एकाच प्रकारचा धंदा करणाऱ्या दोन किंवा अधिक कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी मॅनेजिंग एजंटाकडे असूं नये. (३) खाजगी कंपन्यांना मॅनेजिंग एजंट असूंच नयेत. (४) कंपन्यांची मॅनेजिंग एजंट म्हणून नेमणूक होऊं नये. (५) मॅनेजिंग एजंटांना निव्वळ नफ्याच्या कांहीं प्रमाणांत हिस्सा मिळावयाचा, त्याची कमाल मर्यादा निश्चित करण्यांत यावी. नफा झाला नाहीं किंवा थोडा झाला, तर त्यांना मिळावयाची किमान रकम ही वसूल भांडवलाच्या कांहीं प्रमाणांत असावी. हें प्रमाण ठरवून द्यावें. (६) मॅनेजिंग एजंटांना कांहींहि ऑफिस अलावन्स मिळूं नये. (७) मॅनेजिंग एजंटाची नेमणूक झाल्यानंतरच्या पहिल्या वार्षिक सभेंत त्याचें वेतन भागीदारांपुढें संमतीसाठीं मांडावें. (८) (अ) निव्वळ नफ्याचा कांहीं हिस्सा किंवा (ब) नफा न झाल्यास अथवा तो अपुरा झाल्यास मिळावयाचें किमान वेतन, ह्यांखेरीज इतर कोणत्याहि मार्गानें मॅनेजिंग एजंटास वेतन मिळूं नये. मॅनेजिंग एजंट ह्यांना स्वतःस किंवा ज्यांचेंत त्यांचे हितसंबंध आहेत, अशांस विक्रीवर, उलाढालीवर अथवा खरेदीवर कमिशन घेतां येणार नाहीं. (९) मॅनेजिंग एजंटास त्याच्या गैरव्यवस्थेबद्दल काढण्यांत आलें किंवा त्याच्या हुकमतीखालील भागांच्या मतनोंदणीचे जोरावर काढण्यांत आलें, तर त्याला नुकसानभरपाई मिळणार नाहीं. (१०) मॅनेजिंग एजंटाची फेरनेमणूक मुख्य कंपनीच्या स्पेशल ठरावानेंच होऊं शकेल. एजन्सीच्या कराराची प्राथमिक मुदत १० वर्षें राहील व फेरनेमणूक प्रत्येक वेळीं ५–५ वर्षांकरितां केली जाईल. पुऱ्या झालेल्या मुदतीमधील सर्व वर्षांसाठीं ठराविक सरासरी दरानें डिव्हिडंड देणें मॅनेजिंग एजंटांना शक्य झालें असलें, तर त्यांच्या पुढील पांच वर्षांच्या फेरनेमणुकीस ऑर्डिनरी ठराव चालेल. (११) कंपनीशीं झालेल्या करारानुसार आणि डायरेक्टरांच्या नियंत्रणाखालीं का

मार्गदर्शनाखाली ('कंट्रोल व डायरेक्शन') ज्या व्यक्तीकडे किंवा फर्मकडे कंपनीची व्यवस्था सोपविलेली असते, तिला मॅनेजिंग एजंट म्हणावें; मग त्याला कोणतेंहि नांव दिलेलें असो, अशी नवी व्याख्या सुचविण्यांत आली आहे. (१२) मॅनेजिंग एजन्सीचा प्रत्येक करार रजिस्ट्रारकडे नोंदविला पाहिजे. (१३) डायरेक्टरांच्या तीन चतुर्थांश मताधिक्यानें संमति दिल्या-विना मॅनेजिंग एजंटांस कर्ज उभारतां येणार नाहीं. (१४) कंपनी-च्या वास्तविक कामाकरितांच कर्ज उभारतां येईल; इतर कोणत्याहि कामासाठी नाहीं. (१५) ८६ ड, ८७ ड आणि ८७ इ ह्यांच्यांतील नियमभंगास ५,००० रु. दंड सांगितला आहे (१६) कंपनीच्या भावंड कंपन्यांत पैसे गुंतविता कामा नयेत. ज्यांत मॅनेजिंग एजंटांचा हितसंबंध आहे, अशा कंपन्यांचे कंपनीनें शेअर घेतां कामा नयेत किंवा फर्ममध्यें भागीदार होता कामा नये. त्याला दंड ५,००० रु. आहे. (१७) मॅनेजिंग एजंटांशीं कंपनीनें करंट अकाउंट ठेवतां कामा नये. त्याला दंड ५,००० रु. आहे. (१८) प्रत्येक ताळेबंदांत कंपनीनें शेअर्स, डिबेंचर्स इ. रूपानें गुंतविलेल्या रकमांचा तपशील दिला पाहिजे. (कंपन्यांचीं नांवें, त्यांच्या मॅ. एजंटांचीं नांवें, व्याजाचा दर इ.) इनव्हेस्टमेंट व स्टॉक इन ट्रेड ह्यांचें मूल्यमापन, बाजारभावापेक्षां पडलेली किंमत कमी असल्यास पडलेल्या किंमती-प्रमाणें व बाजारभाव हा पडलेल्या किंमतीपेक्षा कमी असल्यास बाजारभावाप्रमाणें केलेलें आहे, असें स्पष्ट विधान ताळेबंदांत केलें पाहिजे. ह्या तत्त्वाचा भंग केल्यास त्याचें कारण सांगितलें पाहिजे. दंड ५,००० रु. ठेवला आहे. (१९) भावंड-कंपन्यांकडून येणें असलेलें 'बुक डेट' वसूल होऊं शकलें नाहीं तर मॅनेजिंग एजंटांनीं, नाहींतर डायरेक्टरांनीं त्याची भरपाई करावी. (२०) इतर कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी मिळविणें, इत्यादि-सारख्या कंपनीच्या व्यवहाराशीं संबंध नसलेल्या कामाकडे कंपनीच्या पैशाचा विनियोग मॅनेजिंग एजंटांनीं करता कामा नये. (२१) ८७ क (३) ह्यामध्यें दिलेली निव्वळ ('नेट') नफ्याची व्याख्या खालीलप्रमाणें सुधारण्यांत आली आहे:— ठोक ('ग्रॉस') नफ्यांतून पुढील बाबी वगळाव्याच्या—(१) चालू ("वर्किंग") खर्च, डायरेक्टरांचा मेहेनताना, नोकर-वर्गास, इंजिनिअरांस वगैरेंस दिलेला बोनस, कमिशन इ. (२) कर्जावरील व अॅडव्हान्सवरील व्याज. (३) डिबेंचर्स व इतर स्थायी कर्जावरील व्याज (४) दुरुस्त्या वगैरे, आणि (५) घसारा. ठोक नफ्यांत पुढील बाबी मिळविणेच्या नाहींत—(अ) सरकार किंवा सार्वजनिक संस्था ह्यांचेकडून मिळालेली वॅटी किंवा सबसिडी (ब) शेअर विक्रीवरील वाढावा ('प्रीमिअम') (क) रद्द ('फॉरफीट') केलेल्या शेअर्सच्या विक्रींतील नफा, आणि (ड) कंपनीच्या सर्व किंवा कांहीं मालमत्तेच्या विक्रींतील नफा. मॅनेजिंग एजंटाचें वेतन ही खर्चांतील एक बाब असल्यानें, ह्या वेतनाची शेकडेवारीनें रकम ठरविण्यासाठी निव्वळ नफा काढण्या-पूर्वी तें वेतन ठोक नफ्यांतून वजा घातलें पाहिजे. (२२) नफ्याचा फायदा न मिळाल्याच्या नुकसानभरपाईदाखल मॅनेजिंग एजन्सी करारांत ह्यापुढें तरतूद करतां येणार नाहीं. (२३) मॅनेजिंग एजंटांना किमान वेतन ठरवून दिलें असेल, तें त्यांना १२ समान मासिक हप्त्यांत घेतां येईल. बाकीचें वेतन, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद हीं भागीदारांच्या साधारण सभेनें मंजूर केल्यानंतरच त्यांस घेता येईल. (२४) मॅनेजिंग एजंटांवर विशेषतः कर्जउभारणी, पैशाची गुंतवण, कर्जे देणें व खर्च ह्या बाबतींत डायरेक्टरांनीं देखरेख व नियंत्रण ठेवण्याचें आहे. ह्या बाबतींत कायद्याचा किंवा कंपनीच्या आर्टि-कल्सचा भंग झाला अथवा कंपनीस नुकसान आलें, तर मॅनेजिंग एजंटांबरोबर डायरेक्टरहि जबाबदार रहातील. (२५) सर्व निर्बंध दूर सारून डायरेक्टरांना, मॅनेजिंग एजंटांना किंवा भावंड-कंपन्यांना कर्जें देण्यांत आलीं, तर त्यांनीं अत्यंत जाचक ('प्रोहिबिटिव्ह') दरानें व्याज दिलें पाहिजे. कायद्याप्रमाणें त्यांचेवर इलाज होईल, तो वेगळाच. (२६) नफा-तोटा पत्रकांत मॅनेजिंग एजंटाचें वेतन खर्चीं घातलें असेल, त्याचा हिशेब त्या पत्रकास जोडला पाहिजे. कायद्याप्रमाणें व कंपनीच्या आर्टिकल्सप्रमाणें हा हिशेब केलेला आहे किंवा नाहीं, ह्याचा दाखला कंपनीच्या ऑडिटरनें द्यावयाचा आहे. (२७) कांहीं विशिष्ट धंद्यांत अथवा कंपन्यांत मॅनेजिंग एजन्सीची पद्धत चालू न देण्याचा निर्धार सरकार वेळोवेळीं जाहीर करूं शकेल, असा त्यास अधिकार देण्यांत यावयाचा आहे.

### खाजगी कंपन्या

गेल्या कांहीं महिन्यांत पुष्कळच खासगी कंपन्या नोंदविल्या गेल्या आहेत, त्याचप्रमाणें खासगी कंपन्यांचें पब्लिक कंपन्यांशीं प्रमाणहि पुष्कळच वाढलें आहे. खासगी कंपन्यांचा कारभार—अधि-कार नियंत्रित होणें व त्यांस अधिक प्रसिद्धि मिळणें आवश्यक झालें आहे. ह्याकरितां सरकारच्या सूचना अशा आहेत:—

(१) खासगी कंपन्यांचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हीं सध्या लायकीच्या ऑडिटरांनीं तपासलीं नाहींत तरी चालतें. परंतु ह्यापुढें तें सक्तीचें व्हावें. (२) त्यांचे वार्षिक हिशेब व ताळेबंद रजिस्ट्रारकडे नोंदविण्यांत यावेत. (३) नफा-तोटा पत्रक, ताळेबंद व डायरेक्टरांचा रिपोर्ट, हीं कंपनीच्या सभासदांकडे पाठ-विलीं जावींत. (४) प्रत्येक खासगी कंपनीस किमान एक तरी डायरेक्टर हवा. (५) ५४ अ (२) मधील नियम—पब्लिक कंपनीनें कंपनीचे भाग घेण्यासाठी कर्जें वगैरे देऊं नयेत—खासगी कंपन्यां-सहि लागू करण्यांत यावा. (६) ९१ ड मधील नियम—ज्याचा कंपनीशीं करार केलेला आहे अशा तिऱ्हाइताचें नांव स्पष्ट कर-ण्याची कंपनीच्या मॅनेजरवरील अथवा एजंटवरील जबाबदारी खासगी कंपन्यांचे बाबतींतहि लागू करावी. (७) व्हॉलंटरी वाइंडिंग अपचा ऑर्डिनरी ठराव रजिस्ट्रारकडे नोंदविण्यांत यावा (८) ७९ (१) मधील साधारण सभेचे नियम खासगी कंपन्यांस लागू व्हावेत. (९) डायरेक्टरांची संमति आणवून रजिस्ट्रारकडे नोंदवावी. (१०) ८७ ड मधील मॅनेजिंग एजंटास कर्जाबाबत अटी खासगी कंपन्यांसहि लागू व्हाव्यात. (११) १४६ मधील प्रेफरन्स भागदार व डिबेंचर होल्डर्स ह्यांचे पावती, रिपोर्टांची पाहणी, इत्यादि बाबत अधिकार खासगी कंपन्यांसहि लागू असावेत. (१२) हिंदी खाजगी कंपन्यांना जे नियम लागू असतील, ते विदेशी खासगी कंपन्यां-सहि लागू व्हावेत.

### भागांची ट्रॅन्स्फर

कंपन्यांची खरी मालकी शोधून काढण्यासाठी तपासनीस नेमण्याचा मध्यवर्ती सरकारास अधिकार असावा, त्याचप्रमाणें शेअर्स व डिबेंचर्स ह्यांत हितसंबंध असणाराबाबत त्यास माहिती मागविता यावी, शेअर्स व डिबेंचर्स ह्यांच्या ट्रॅन्स्फरविषयीं त्याला बंधनें घालता यावींत, अशी सरकारची सूचना आहे. कंपनीच्या आर्टिकल्सनीं तशी सवड दिली असल्यास डायरेक्टरांना पूर्ण भरणा झालेल्या शेअर्सची ट्रॅन्स्फर नोंदविण्यास नकार देण्याचा सध्या अधिकार आहे. ह्या अधिकाराचा दुरुपयोग होऊं नये, ह्या-करितां तरतूद करणें आवश्यक वाटून सरकारनें दुरुस्ती सुचविली आहे. जेथें योग्य कारणें नसताना डायरेक्टरांनीं शेअर ट्रॅन्स्फरला नकार दिला असेल तेथें कोर्टांना शेअर ट्रॅन्स्फर करविण्याचा अधिकार असावा, अशी ही दुरुस्ती आहे.

# विलीन झालेल्या दक्षिणी संस्थानांतील बँकांच्या प्रतिनिधींची परिषद

(विलीन झालेल्या दक्षिणी संस्थानांतील बँकांच्या पूर्वीच्या घडीचे जागीं त्यांना नवी घडी बसवावी लागत आहे, त्याचीं कारणें त्या बँकांच्या अधिकारक्षेत्रांतील नाहींत. प्रत्येक ठिकाणच्या विशिष्ट परिस्थितीस अनुसरून आणि तेथील संस्थानी धोरणाप्रमाणें बँकांची वाढ व प्रगति झाली आहे; त्यामुळें सर्व बँकांचे प्रश्न कांहीं प्रमाणांत स्वतंत्र असे आहेत. बँकांच्या अडचणींचा सामुदायिक रीतीनें विचार करून त्या अडचणी सरकारपुढें मांडाव्या आणि पूर्वीच्या सवलती चालू ठेवण्याचें अगत्य त्यास पटवून सांगावें, ह्या दृष्टीनें कांहीं मंडळींनीं पुढाकार घेऊन बँकांच्या प्रतिनिधींची परिषद् बोलाविली. परिषदेमध्यें मोकळेपणानें चर्चा होऊन पुढील प्रगतीची दिशा आंखण्यांत आली. ह्या परिषदेचा समग्र वृत्तांत खालीं दिला आहे.)

विलीन झालेल्या दक्षिणी संस्थानांतील बँकांच्या प्रतिनिधींची परिषद् सोमवार दिनांक २६–९–१९४९ इ. रोजीं श्री. म. व्यं. शिंगरे यांचे दिवाणखान्यांत ५११ बुधवार, पुणें येथें दुपारीं चार वाजतां भरली होती. परिषदेस पुढील प्रतिनिधी हजर होते.

### उपस्थित प्रतिनिधी

१ रावबहादूर व्ही. व्ही. यारगोप. (बुधगांव बँक)
२ श्री. बा. रा. वर्तक. (बँक ऑफ औन्ध)
३ श्री. र. दि. माजगांवकर. (बँक ऑफ औन्ध)
४ श्री. एन्. जी. गद्ग. (रामदुर्ग स्टेट बँक)
५ श्री. के. डी. शिराळकर. (मिरज स्टेट बँक)
६ श्री. म. व्यं. शिंगरे. (भोर स्टेट बँक)
७ श्री. रावसाहेब य. द. खोले. ”
८ श्री. ना. पा. थोपटे. ”
९ श्री. बा. ग धंदुके. ”
१० श्री. चं. रा. राठी. ”
११ श्री. के. वि. केळकर. ”
१२ श्री. व्ही. जी. रानडे. ”
१३ श्री. बी. जी. चांदोरकर. (बँक ऑफ औन्ध)
१४ श्री. के. आ. चौगुले. (बुधगांव बँक)
१५ श्री. चौगुले. (गणेश बँक ऑफ कुरुन्दवाड)
१६ श्री. वा. रा. साठे. (गणेश बँक ऑफ कुरुन्दवाड)
१७ श्री. द. ल. तेरवाडकर ” ” ”
१८ श्री. भागवत. (फलटण लक्ष्मी सेन्ट्रल को. ऑ. बँक)
१९ श्री. रा. गो. आगाशे. (मॅनेजर, भोर स्टेट बँक)

प्रथमतः श्री. चांदोरकर यांनीं रावबहादूर व्ही. व्ही. यारगोप यांनीं अध्यक्षपद स्वीकारावें अशी सूचना मांडली. रावसाहेब खोले यांनीं त्याला अनुमोदन दिले. नंतर रावबहादूर यारगोप यांचे अध्यक्षतेखालीं परिषदेचे कामास सुरुवात झाली.

श्री. म. व्यं. शिंगरे, चेअरमन भोर, स्टेट बँक लिमिटेड, यांनीं स्वागतपर पुढील प्रमाणें भाषण केलें.

### श्री. शिंगरे ह्यांचें भाषण

सहकारी बंधु,

आज आपण आमच्या आमंत्रणाला मान देऊन सर्व विलीन झालेल्या संस्थानांतील बँकांचे प्रतिनिधी म्हणून संस्थानें विलीन झाल्यामुळें निर्माण झालेल्या अडचणींचा विचार करण्याकरितां जमलों आहोंत त्याबद्दल मी सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतों.

सर्व बँकांना संस्थानेनें विशिष्ट प्रकारच्या सवलती दिल्या होत्या. बहुतेक बँकांतून सरकारचें भागभांडवल होतें. सरकारचे प्रतिनिधी डायरेक्टर बोर्डावर होते. पैसे ट्रॅन्सफर करण्याबाबत पोलीस संरक्षण वगैरे सवलती होत्या. बँकांच्या सेफ्स सरकारी तिजोरींत ठेवण्याची सवलत होती. कांहीं बँकांमार्फत सरकारी तिजोरीची कामेंहि चालत असत. अशा प्रकारच्या सरकारी पाठिंब्यामुळें ठेवीदारांचा बँकांवर विश्वास बसला व त्यामुळेंच थोड्या वर्षांत पुष्कळ बँकांना चांगली प्रगति करतां आली. आतां संस्थानें विलीन झाल्यामुळें ह्या सर्व सवलती रद्द झाल्या. मुंबई सरकार संस्थाननें घातलेलें भाग भांडवल सुद्धां विकण्याचे विचारांत आहे. या सर्व सवलती एकदम काढून घेतल्यामुळें आपल्याला नवीन घडी बसवावी लागत आहे. बँका नेहमी विश्वासावर चालत असतात. ठेवी वाढल्याशिवाय बँकांची प्रगति होत नाहीं. हिंदुस्थानांत बँकांचा प्रसार इतर देशांच्या मानानें फारच कमी आहे. बहुतेक लोक अशिक्षित असल्यामुळें त्यांचा बँकांवर विश्वास बसत नाहीं. संस्थानी सरकारच्या पाठिंब्यामुळें संस्थानांतील बँकांनीं लोकांना बँकेच्या व्यवहाराची सवय लावली व त्यामुळें व्यवहाराला पोषक अशी सवय लावण्याचे श्रेय ह्या बँकांना मिळालें आहे. संस्थानी मुलूख हा अतिशय मागासलेला व शेतकीप्रधान असा आहे. त्यांतील लोकांमध्यें अशा तऱ्हेनें वळण लावून ह्या बँकांनीं देशाची फारच मोठी कामगिरी केली आहे. संस्थानमध्यें संस्थान सरकारचे आश्रयाखालीं जे उद्योगधंदे निघाले आहेत त्या सर्वांना बँकांनीं पैशाची मदत केली आहे व करीत आहेत. लोकांमध्यें बँकिंगची सवय निर्माण करण्याचें काम सरकारी पाठिंब्यामुळेंच बँका करूं शकल्या. ज्या संस्थानमध्यें सहकारी व्यवसायाचा प्रसार झाला नव्हता तेथें त्या त्या बँकांनी सहकारी, चळवळीचा प्रसार केला आहे. तेव्हां पूर्वी मिळत असलेल्या सर्व सवलती हल्लीच्या सरकारनें कायम ठेविल्या तर ह्या उपयुक्त कामाला मदत केल्याचें श्रेय सरकारला मिळणार आहे.

नवीन बँकिंग कंपनीज ॲक्ट अन्वयें ज्या ज्या कांहीं अडचणी येतील त्यांचा सामुदायिक रीतीनें विचार करून एकमुखानें प्रयत्न करता यावा व सध्याच्या परिस्थितींतून मार्ग काढतां यावा या दृष्टीनें सर्व स्टेट बँकांची एक यूनिअन स्थापन करावी व तिचे मार्फत सर्व सामान्य प्रश्नांचा विचार व्हावा असें वाटतें.

शेवटीं सर्व बँकांच्या प्रतिनिधींनीं उपस्थित राहून या कार्याला पाठिंबा दिला याबद्दल मी सर्व प्रतिनिधींचे आभार मानतो.

नंतर प्रत्येक प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होऊन खालील सात ठराव एकमतानें मंजूर झाले.

परिषदेचे शेवटीं श्री. शिंगरे यांनीं अध्यक्षांचे व इतर प्रतिनिधींचे आभार मानले. श्री. रा. शिराळकर यांनीं भोर स्टेट बँकेचे चेअरमन श्री. शिंगरे, रावसाहेब खोले व मॅनेजर आगाशे यांचे आभार मानले. भोर बँकेतर्फे उपस्थित सभासद व अध्यक्ष यांचे आभार न. भू. थोपटे यांनीं मानले व परिषदेचें काम समाप्त झालें.

### परिषदेंत मंजूर झालेले ठराव

ता. २६।९।४९ रोजीं, विलीन झालेल्या दाक्षिणी संस्थानांतील बँकांच्या चालकांच्या भरलेल्या परिषदेमध्यें पास झालेले ठरावः—

ठराव नं. १ :—विलीन झालेल्या संस्थानांतील बँकांमध्यें पूर्वींच्या सरकारनें शेअर रुपानें जें भांडवल गुंतविलें होतें तें भांडवल संस्थानें विलीन झाल्यामुळें मुंबई सरकारकडे वर्ग झालें आहे. तें भांडवल लोकांना विकण्याकरितां म्हणून मुंबई सरकारनें जो ठराव केला आहे तो सदर बँकांवरील लोकांचा विश्वास कायम ठेवण्याचे दृष्टीनें स्थगित करावा आणि आपलें भांडवल तसेंच बँकांमध्यें राहू यावें अशी ही परिषद् सरकारला विनंति करीत आहे.

ठराव नं. २:—पूर्वींच्या संस्थानी सरकारनें बँकांना बँकांची तिजोरी वगैरे बाबत सरकारी खजिन्यांत ठेवण्याबाबत अगर अन्य रीतीनें ज्या सवलती दिल्या होत्या त्या त्याच स्वरूपांत शक्य असेल तेथें मुंबई सरकारनें चालू ठेवाव्यात अशी ही परिषद् सरकारला विनंति करीत आहे.

ठराव नं. ३—संस्थानांमध्यें शेतकरी ऋण विमोचन संबंधी कायदा अस्तित्वांत नव्हता त्यामुळें विलीन झालेल्या संस्थानांतील बँकांनीं पुष्कळ शेतकऱ्यांना कर्ज दिलेलीं आहेत, परंतु आतां संस्थानें विलीन झालेमुळें १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा कायदा लागू झालेला आहे. त्या योगानें शेतकऱ्यांना दिलेलीं कर्जें वसूल होण्याच्या बाबतींत अडचणी निर्माण होऊन बँकांचें नुकसान होत आहे व होणार आहे. म्हणून को-आपरेटिव्ह सोसायट्या आणि शेड्युल्ड बँका सदर कायद्याचे तिसऱ्या कलमाप्रमाणें वगळण्यांत आल्या आहेत. त्याप्रमाणेंच या विलीन झालेल्या संस्थानांतील बँकांना वगळण्याबद्दल सदरहू कायद्यांत दुरुस्ती करावी अगर अन्य कायदेशीर उपाय त्वरित योजावेत अशी ही परिषद् सरकारला विनंति करीत आहे.

ठराव नं. ४—ज्या संस्थानांतील बँकांनीं पूर्वींच्या संस्थानी सरकारला कर्जें दिलीं आहेत अगर संस्थानी सरकारच्या ट्रेझरींत रकमा डिपाझिट ठेविल्या आहेत त्या रकमा परत मिळण्याच्या बाबतींत फार दिरंगाई होत आहे. म्हणून या रकमा लहान व्याजानें दिलेल्या असल्यामुळें बँकांचें नुकसान होत आहे आणि दैनंदिन व्यवहारांत नवीन बँकिंग कायद्याप्रमाणें भांडवल कमी पडत आहे. करितां सदर रकमा त्वरित त्या त्या बँकांना परत कराव्यात अशी ही परिषद् सरकारला विनंति करीत आहे.

ठराव नं. ५:—संस्थानी सरकारांकडून संस्थाने विलीन होण्यापूर्वी संस्थानी बँकांकडे निरनिराळ्या ठेवी ठेवण्यांत येत असत त्याप्रमाणें जेथें तालुका ट्रेझरीज आहेत त्या ठिकाणीं स्टेट बँका असतील तर त्यांच्याकडे पूर्वीप्रमाणेंच ठेवी ठेवाव्यात अशी ही परिषद् सरकारला विनंति करीत आहे.

ठराव नं. ६ :—विलीन झालेल्या संस्थानी बँकांना त्यांच्या दररोजच्या कामकाजांत नवीन नवीन होणाऱ्या कायद्यामुळें वेळोंवेळीं अडचणी निर्माण होतात. त्या बाबतींत एकत्रित येऊन विचारविनिमय होणें जरूरीचें आहे. त्याकरितां या सर्व स्टेट बँकांची Merged Deccan States Banks Association म्हणून एक संस्था स्थापन करावी व या संस्थेच्या खर्चाकरितां एक निधि निर्माण करावा.

(ब) या संस्थेच्या घटनेसंबंधीं नियम वगैरे करण्याकरितां म्हणून खालील सद्गृहस्थांची एक कमिटी नेमावी.

(१) रावबहादूर व्ही. व्ही. यारगोप.
(२) श्री. बी. जी. चांदोरकर.
(३) श्री. म. व्यं. शिंगरे.
(४) श्री. य. द. खोले.
(५) श्री. के. आ. चौगुले.
(६) श्री. आगाशे, सेक्रेटरी.

ठराव नं. ७ :—ठराव नं. १ ते ५ मुंबईचे अर्थमंत्री नामदार वैकुंठराय मेहता यांच्या पुढें मांडण्याकरितां म्हणून खालील सद्गृहस्थांचें एक शिष्टमंडळ नेमावें.

(१) रावबहादूर व्ही. व्ही. यारगोप, बुधगांव बँक.
(२) श्री. बा. रा. वर्तक, औंध बँक.
(३) श्री. वा. रा. साठे, कुरुंदवाड बँक.
(४) श्री. के. आ. चौगुले, बुधगांव बँक.
(५) श्री. म. व्यं. शिंगरे, भोर स्टेट बँक.
(६) श्री. के. डी. शिराळकर, मिरज स्टेट बँक.
(७) श्री. एन. जी. गद्ग, रामदुर्ग बँक.
(८) रावसाहेब खोले, भोर स्टेट बँक.

## अर्थमंत्री, श्री. मेहता ह्यांचें आश्वासन

परिषदेस उपस्थित असलेल्या प्रतिनिधींचा परिचय व्हावा म्हणून व त्यांचेबरोबर मनमोकळेपणानें चर्चा करतां यावी या हेतूनें मुंबई सरकारचे अर्थमंत्री ना. वैकुंठराय मेहता हे परिषदेचे वेळीं सायंकाळीं ७-१५ ला उपस्थित होते. ना. अर्थमंत्री यांचे या भेटीचे वेळीं पुणें शहरांतील बँकांच्या प्रतिनिधींनाहि आमंत्रण दिलें होतें. त्याप्रमाणें कांहीं बँकांचे अध्यक्ष व व्यवस्थापक हजर होते. त्याचप्रमाणें इतरहि निमंत्रित नागरिक हजर होते.

ना. वैकुंठराय मेहता यांनीं प्रतिनिधींना उद्देशून सरकारचें बँकांच्या बाबतचें धोरण स्पष्ट केलें त्याचा आशय असा:—

सामान्यतः सरकार रिझर्व बँक व इंपीरियल बँक या शिवाय दुसऱ्या कोणत्याही बँकांशीं संबंध ठेवूं शकत नाहीं. परंतु संस्थानें विलीन झाल्यानें तेथें असलेल्या बँकांचा नवीन असा प्रश्न उपस्थित झाला आहे. कांहीं बँकांनीं पूर्वींच्या संस्थानी सरकारशी करार करून शाखा उघडल्या आहेत. उदाहरणार्थ, बँक ऑफ इंडियानें पालनपूर संस्थानशी करार करून शाखा उघडली आहे. बँक ऑफ बरोडा अशीच मोठी स्टेट बँक आहे.

त्यांनीं संस्थानांतील बँकांना संस्थान सरकारकडून मिळत असलेल्या सवलती वगैरेंची माहिती करून घेतली. तसेंच उद्यां शिष्टमंडळ जे ठराव पुढें मांडणार आहेत, त्यांची रूपरेषा समजून घेण्याची त्यांनीं इच्छा प्रकट केल्यावरून रावबहादूर यारगोप यांनीं त्यांना परिषदेंत पास झालेल्या ठरावाचा गोषवारा सांगितला. नंतर श्री. चौगुले यांनीं सरकारनें सहानुभूतिपूर्वक बँकांच्या मागण्यांचा विचार करावा अशी विनंति केली. ना. मेहता यांनीं सर्व गोष्टी विचारांत घेऊन निर्णय घेण्यांत येईल असें आश्वासन दिलें. शेवटीं चहापान झाल्यावर श्री. शिंगरे यांनीं नामदार मंत्र्यांचे आभार मानले व हा समारंभ समाप्त झाला.

ठराव नं. ७ प्रमाणें शिष्टमंडळानें २७ सप्टेंबर रोजीं अर्थमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना परिषदेचे ठराव सादर केले.

म. व्यं. शिंगरे.
चेअरमन,
भोर स्टेट बँक लि.

व्ही. व्ही. यारगोप,
अध्यक्ष.

## भारताच्या वीज उत्पादनांत १२१/२% वाढ

भारतामध्यें १९४८ सालीं १९४७ च्या मानानें १२·३% अधिक वीज निर्माण करण्यांत आली. उत्पादन शक्ती मात्र फक्त ३% वाढली, ह्याचा अर्थ वीजगृहें ज्यास्त वेळ चालविण्यांत आलीं. १९४८ अखेर भारतांतील वीजगृहांची वीज उत्पादन-शक्ती १४ लक्ष किलोवॅट इतकी होती आणि प्रत्यक्ष वीज निर्मिती ४५७१/२ कोटी किलोवॅट तास इतकी झाली.

### दर माणशी खप

१९४८ मधील दर माणशीं विजेच्या खपाचे आकडे येथें दिले आहेत:—

| प्रांत अगर संस्थान | किलोवॅट तास |
|---|---|
| दिल्ली | ९५ |
| मुंबई | ४९ |
| म्हैसूर | ३८ |
| प. बंगाल | ३७ |
| त्रावणकोर | १८ |
| कोचीन | ८ |
| मद्रास | ८ |
| अजमेर–मारवाड | ७ |
| सं. प्रांत | ६ |
| पू. पंजाब | ५ |

इतर प्रांतांतील वार्षिक दरमाणशी खप ५ किलोवॅट तासापेक्षां कमी आहे आणि आसाम व ओरिसा येथील खप १ किलोवॅट तासाइतकाहि नाहीं.

शेतीस पाणी देण्यासाठी लागलेल्या विजेचें प्रमाण संयुक्त प्रांताच्या एकूण विजेच्या उठावांत १५% भरलें. मद्रास प्रांतांत तें ११% होतें.

भारतांतील सर्व वीजगृहांवर मिळून १९४७ अखेर ११५१/२ कोटी रुपये एवढा भांडवली खर्च झालेला आहे.

कित्येक मोठे कारखाने त्यांस लागणारी वीज स्वतःच निर्माण करतात. अशी वीज निर्मिती १९४८ सालीं ११५ कोटी किलोवॅट तास झाली. त्यास भर म्हणून कारखान्यांनीं वीज गृहांकडून २३२१/२ कोटी किलोवॅट तास वीज घेतली. कपाशीच्या सुताच्या व कापडाच्या गिरण्यांना १०८ कोटी किलोवॅट तास वीज लागली, आणि लोखंड–पोलाद, ताग व सिमेंट ह्यांच्या कारखान्यांनीं मिळून ९७ कोटी किलोवॅट तास वीज वापरली.

### वीज निर्मिती केंद्रें

भारतांत एकूण ३६३ वीज निर्मिती केंद्रें १९४८ अखेर चालू होतीं. त्यांपैकीं २६५ डिझेल तेलावर चालत होतीं, ६५ केंद्रांची प्रेरक शक्ति वाफ ही होती व जल-शक्ति निर्मित ३३ केंद्रें होतीं. विजेच्या एकूण उत्पादनाचा विचार केला, तर वाफेवर चालणाऱ्या वीजगृहांनीं ४४·७% वीज निर्माण केली आणि जल-शक्तीवर चालणाऱ्या वीजगृहांत ५१·९% वीज तयार झाली, असें प्रमाण आढळतें. म्हणजे, डिझेल तेलावर चालणारीं केंद्रें बहुसंख्य असलीं, तरी त्यांची वीज निर्मिति एकूण निर्मितीच्या फक्त ३·४% आहे.

एकूण वीज निर्मितीच्या ६३% वीज निर्मिति कंपन्यांच्या मालकीच्या वीजगृहांत झाली, ३६% वीज सरकारी मालकीच्या वीजगृहांत तयार झाली आणि १% पेक्षांहि कमी वीज म्युनिसिपल वीजगृहांत निर्माण झाली.

### ए. सी. व डी. सी. करंट

ग्राहकांना पुरवठा केलेल्या विजेपैकीं ९१·२% वीज ए. सी. करंटची व बाकीची ८·८% वीज डी. सी. करंटची होती.

—×—

### टाटा हैड्रो–इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कं. लि.

३० जून, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें १९ कोटी, ६० लक्ष युनिट वीज विकली. तिचें उत्पन्न ४३,३९,३२५ रु. झालें. त्यापूर्वीच्या वर्षी २० कोटी, १८ लक्ष युनिट वीज खपून तिचें उत्पन्न ४३,२३,६४८ रु. झालें होतें. रेल्वेजना पूर्वी दिली जाणारी वीज इतर ग्राहकांना दिल्यामुळें, वीज ५८ लक्ष युनिट कमी खपून उत्पन्न २५,६७७ रु. ज्यास्त झालें. निव्वळ नफा २०,४३,१५५ रु. उरला.

### आंध्रा व्हॅली पॉवर सप्लाय कं. लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी २८ कोटी, ४० लक्ष युनिट वीज विकून तिनें ६३,४४,४७२ रु. उत्पन्न मिळविलें. त्यापूर्वीच्या वर्षीचे तत्सम आकडे २९ कोटी, २७ लक्ष युनिट व ६२,६९,४७२रु. असे आहेत. ३·०% वीज कमी खपूनहि उत्पन्न १·२% अधिक झालें, ह्याचें कारण ज्यास्त दर देणारीं गिऱ्हाइकें वाढलीं व रेल्वेचा पुरवठा कमी केला, हें होय. निव्वळ नफा २२,४९,७७३ रु. उरला.

### टाटा पॉवर कंपनी लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी ५० कोटी, ९९ लक्ष युनिट वीज विकून तिचें १ कोटी, १५ लक्ष रु. उत्पन्न मिळविलें. त्यापूर्वीचे वर्षी ५२ कोटी, ४४ लक्ष युनिट वीज खपून कंपनीस तिचे १ कोटी, १२ लक्ष रु. मिळाले होते. म्हणजे १ कोटी, ४५ लक्ष युनिट वीज कमी खपूनहि उत्पन्न २,७४,४३९ रुपयांनीं वाढलें. कमी दराच्या रेल्वेच्या गिऱ्हाइकाऐवजी ज्यास्त दर देणारीं इतर गिऱ्हाइकें वाढलीं आहेत. निव्वळ नफा ४२,५६,१६६ रु. झाला.

### दि म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

किर्लोस्कर बंधु लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीनें गेल्या वर्षी ८०,२९४ रु. निव्वळ नफा मिळविला. डायरेक्टरांनीं ६% डिव्हिडंड सुचविलें आहे. ट्रेडिंग व मॅन्युफॅक्चरिंग अकाउंटमधून ८,४०,९६९ रु. ठोक नफा नफा–तोटा खात्याकडे घेण्यांत आला आहे. त्यांतून सर्व व्यवस्था व इतर खर्च भागवून, १,५०,००० रु. ची इनकम टॅक्सची तरतूद करून व ३,८०,६६० रु. घसारा काढून वरील निव्वळ नफा दिसत आहे. कंपनीचें वसूल भांडवल १०,००,००० रु. चें आहे; रिझर्व्ह व इतर फंडांत १,२१,२२८ रु. आहेत आणि घसाराखातीं १४,१८,७५८ रु. आहेत. ह्यावरून कंपनीनें आपली जिंदगीची किंमत ताळेबंदांत अगदीं कमी कमी करीत आणून स्वतःची मजबुती चांगलीच वाढविली आहे, हें दिसून येईल. स्टॉक ऑन हँडची किंमत, पडलेली किंवा बाजारभावाची, जी कमी असेल ती धरण्यांत आली आहे. देशाच्या औद्योगीकरणास कंपनी उत्कृष्ट हातभार लावीत आहे. अहवालाचे वर्षी कंपनीच्या मालास समाधानकारक मागणी होती, परंतु गेल्या तीन महिन्यांत ओपन जनरल लायसेन्सच्या सरकारी धोरणामुळें कंपनीस स्पर्धेस तोंड द्यावें लागलें. आतां सरकारच्या नव्या धोरणामुळें कारखान्यास पुन्हा चालना मिळून म्हैसूर किर्लोस्करच्या मालाचा चांगला उठाव होऊं लागेल अशी आशा आहे. कंपनीची वार्षिक सभा २६ नोव्हेंबर रोजीं हरिहर येथें भरणार आहे.

## १९४८–४९ मधील साखरेचें उत्पादन

कानपूरच्या इंडिअन इंस्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलजीचे डायरेक्टर श्री. के. सी. रॉय ह्यांनीं १९४८–४९ सालामधील साखरेच्या उत्पादनासंबंधीं आपला अधिकृत अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यामधील कांहीं माहिती पुढें दिली आहे.

१९४८–४९ सालांत हिंदुस्थानांत उंसापासून १०·०१ लाख टन साखर तयार करण्यांत आली. १९४७–४८ च्या हंगामांत साखरेचें उत्पादन १०·७५ लाख टन झालें होतें. साखरेच्या उत्पादनांत ६·९ टक्के घट झाली आहे असें वरील आंकड्यांवरून दिसून येतें. उत्पादनांत झालेली ही घट उसाच्या व साखरेच्या किंमती कमी झाल्यानें झाली असें म्हटलें आहे. संयुक्त प्रांत आणि बिहार ह्या प्रांतांत उसाची किंमत अनुक्रमें १ रु. १० आ. आणि १ रु. १३ आ. ठरविण्यांत आलेली होती. मागच्या हंगामांत ही किंमत २ रु. ठरविलेली होती त्याचप्रमाणें साखरेची दर मणामागें किंमत १९४७–४८ सालीं ३५ रु. ७ आ. होती ती १९४८–४९ सालांत २८ रु. ८ मण ठरविण्यांत आली. त्यानंतर ती मणामागें २९ रु. १ आणा करण्यांत आली. त्यामुळें एकट्या संयुक्त प्रांतांतच साखरेच्या उत्पादनांत ७२,९०० टनाची घट झाली. इतर प्रांतांतही कमी–अधिक प्रमाणांत उत्पादन घटलें. बिहारमधील हंगाम अधिक काळ चालल्यामुळें तेथील उत्पादन मात्र १६,४०० टनांनीं वाढलें.

हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखान्यांची संख्या अगर ऊंस गाळण्याचा हंगाम ह्या बाबतींत विशेष लक्षांत भरण्यासारखें नवें कांहीं दिसत नाहीं. देशांतील १५२ साखरेच्या कारखान्यांपैकीं १३४ कारखाने हंगामांत चालू होते. १९४७–४८ सालींही येवढेच कारखाने चालू होते. हंगाम ४ ऑक्टोबर १९४८ ते २६ मे १९४९ पर्यंत चालू राहिला. संयुक्त प्रांतांत हंगाम १६३ दिवस चालला. १९४७–४८ सालीं तो १८७ दिवस चालूं राहिला होता. बिहारमध्यें १९४७–४८ सालीं हंगाम ११४ दिवस चालू होता तो १९४८–४९ सालीं ११५ दिवस चालला. संयुक्त प्रांतांतील कारखान्यांनीं चालू हंगामांत ८,१६,००० टन ऊंस गाळला. मागील हंगामांतील हा आकडा ९,७२,००० टन आहे. बिहारमधील कारखान्यांनीं १९४७–४८ सालीं ५,५४,००० टन ऊंस गाळला होता. चालू हंगामांत त्यांनीं ६,१६,००० टन ऊंस गाळला.

पुढील तक्त्यांत १९४७–४८ व १९४८–४९ सालाच्या हंगामांतील तौलनिक आंकडे दिले आहेत.

| | १९४७–४८ | १९४८–४९ |
|---|---|---|
| चालू कारखाने | १३४ | १३४ |
| गाळलेला ऊंस (टन) | १,००,२९,३०० | १,०९,१०,७०० |
| साखरेचें उत्पादन (टन) | १०,००,००० | १०,७४,८०० |
| मोलॅसेस (टन) | ३,६९,८०० | ४,१०,८०० |
| साखरेचा उतारा (%) | ९·९७ | ९·८५ |
| मोलॅसिसचा उतारा (%) | ३·६८ | ३·७६ |

१९४८–४९ अखेर पूर्ण झालेल्या दहा वर्षांतील साखरेच्या उत्पादनाचे आकडे खाली दिले आहेत.

( आकड्यांतून ०० वगळले आहेत. )

| हंगामाचें साल | कारखान्यांची संख्या | गाळलेला ऊंस | साखरेचें उत्पादन | उताऱ्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १९३९–४० | १३८ | १,२७,५२१ | १२,०७८ | ९·४७ |
| १९४०–४१ | १४० | १,०७,१७६ | १०,४६१ | ९·७६ |
| १९४१–४२ | १४१ | ७६,९१० | ७,५१४ | ९·७७ |
| १९४२–४३ | १४१ | १,०१,९७९ | १०,५१८ | १०·३१ |
| १९४३–४४ | १४५ | १,१९,४०८ | १२,००० | १०·०६ |
| १९४४–४५ | १३६ | ९२,११८ | ९,४२२ | १०·२२ |
| १९४५–४६ | १३८ | ९१,०८७ | ९,२२९ | १०·१३ |
| १९४६–४७ | १३५ | ९१,२७१ | ९,०११ | ९·८८ |
| १९४७–४८ | १३४ | १,०९,१०७ | १०,७४८ | ९·८५ |
| १९४८–४९ | १३४ | १,००,२९३ | १०,००९ | ९·९७ |

## इंपीरिअल बँक कायदा दुरुस्तीची पूर्वतयारी

बँकिंग बिलावर हिंदी पार्लमेंटांत गेल्या फेब्रुवारीमध्यें चर्चा झाली, त्यावेळीं इंपीरिअल बँकेवर बरीच टीका झाली. ह्या बँकेचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें, अशीहि मागणी करण्यांत आली. चर्चेस उत्तर देतांना, अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई, ह्यांनीं ह्या प्रश्नांचा काळजीपूर्वक विचार करण्याचें आश्वासन दिलें. गेल्या महिन्यांत डॉ. मथाई ह्यांनीं मुंबईत इंपीरिअल बँकेच्या डायरेक्टर बोर्डाशीं चर्चा केली, त्याच्या अनुरोधानें इंपीरिअल बँक कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल पार्लमेंटास लवकरच सादर करण्यांत येईल, असें समजतें. इंपीरिअल बँकेस मिळत असलेल्या खास सवलती आतां कमी होऊन तिला व्यापारी बँकिंग करण्यास ज्यास्त वाव मिळेल, अशी अपेक्षा आहे. बँकिंगचा देशाच्या अंतर्भागांत प्रसार करण्याचे कामीं इंपीरिअल बँकेचें सहाय्य घेण्यांत येईल, असेंहि म्हणतात. डॉ. मथाई ह्यांनीं ह्या प्रश्नाचीहि मुंबईच्या आपल्या मुक्कामांत चर्चा केली व इतर बँकांचाहि अभिप्राय मागविला, परंतु त्या बँका फारशा उत्सुक दिसल्या नाहींत.

## एक लाखावरील कर्जांचा तपशील द्या

व्यक्ती व पेढ्या ह्यांनीं १ लक्ष रुपयांचे पेक्षा मोठीं कर्जें दिलीं असतील, त्यांचा तपशील दररोज रिझर्व्ह बँकेकडे त्यांनीं पाठविला पाहिजे, अशी तिनें सर्व बँकांना २७ (२) ह्या कलमाखालीं सूचना दिली आहे. कोणत्याहि प्रकारची सट्टेबाजी व साठेबाजी ह्यांस सहायभूत होणारीं कर्जें देखरेखीखालीं रहावीं, हा त्याचा उद्देश आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्रची हैद्राबाद शाखा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.नें हैद्राबाद येथें गुरुवार, ता. २७ ऑक्टोबर रोजीं आपली शाखा सुरू केली. उद्‌घाटन समारंभ हैद्राबाद सरकारचे अर्थ, व्यापार व उद्योग मंत्री ना. सी. व्ही. एस. राव, सी. आय. ई. ह्यांच्या हस्तें झाला. शाखेचा पत्ता " ५३८, सुलतान बझार, हैद्राबाद " असा आहे. बँकेच्या मुंबई शाखेचे एजंट श्री. पी. व्ही. आगाशे, एम. ए., हे तेथील पहिले एजंट म्हणून गेले आहेत.

## पूर्व खानदेश सें. को. बँक लि., जळगांव

### चालू वर्षी रौप्यमहोत्सव

वरील बँकेचें वसूल भांडवल ९,०१,७०० रु. असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत १४,००,०९३ रु. आहेत. ठेवींची रक्कम १ कोटी, ५६ लक्ष रुपयांवर असून ताळेबंदाची बेरीज १ कोटी, ९१ लक्ष रु. आहे. ८ लक्ष, ९० हजार रु. रोख, ८२ लक्ष, ६८ हजार रु. इन्व्हेस्टमेंट, ८९ लक्ष रु. सोसायट्यांस चालू व हंगामी कर्जे, कॅश क्रेडिट, व्यक्तिशः सभासदांस कर्जे इ., इत्यादि जिंदगीचे बाजूकडील महत्त्वाचे आकडे आहेत. बँकेस अहवालाचे वर्षी १,९२,०३० रु. नफा झाला. एवढा मोठा नफा ह्यापूर्वी झाला नव्हता. ह्या आकड्यांवरून बँकेचें मुंबई प्रांतांतील मध्यवर्ती बँकांमधील अग्रस्थान लक्षांत येईल. अहवालाचे वर्षांत बँकेकडील ठेवी ५,१९,५४८ रुपयांनीं वाढल्या आहेत. बँकेनें कर्जे ज्यास्त दिलीं तरी एकत्रित थकबाकीचें प्रमाण कमीच झालेलें आढळतें. शेतीच्या कामास उपयोगांत आणले जाणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर ४% निश्चित केल्याचें जाहीर करणारी मुंबई प्रांतांतील ही पहिलीच बँक आहे.

ताळेबंदांतील कांहीं फंडांच्या बाबी आतां रिझर्व्ह फंडांत वर्ग केल्यामुळें रिझर्व्ह फंडाची रक्कम वसूल भांडवलापेक्षांहि मोठी झाली आहे. आणि ८ नं. च्या नियमाचा व्यापक फायदाहि बँकेस मिळणार आहे. ठोक कापड विक्रेत्याचें व वाटपाचें काम बँकेस मिळालें आहे. धान्य, कापड, इतर जीवनोपयोगी वस्तू, ह्यांच्या नियंत्रणाच्या सुरळीतपणासाठी बँकेनें आपलें बरेंच भांडवल सहकारी संस्थांस पुरविलें आहे. बँकेस २५ वर्षे पूर्ण होऊन गेलीं आहेत व चालू हंगामहि बराच आशादायक आहे. ह्यासाठी चालू वर्षी बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्याचें बोर्डानें ठरविलें आहे. बँकेच्या १३ शाखा व ६ पे ऑफिसेस आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. २९ सप्टेंबर रोजीं झाली. (चेअरमनः श्री. भगवंतराव वा. देशमुख, बी. ए., एलएल. बी., एम. एल. ए.; मॅनेजिंग डायरेक्टरः श्री. रा. या. सोनवणे, बी. ए.; अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर : श्री. व्ही. आर. शिंदे)

### दि बाँबे प्रॉ. को. बँक लि.चे नवे शेअर्स

दि बाँबे प्रॉ. को. बँक लि.चे अधिकृत भांडवल २५ लक्ष रु. आहे, आणि खपलेलें व वसूल भांडवल २०,६७,८५० रु. आहे. डायरेक्टरांनीं आतां प्रत्येकी ५० रु. चे ३८,६४३ शेअर प्रत्येक शेअरला ६० रु. किंमत घेऊन म्हणजे १० रु. वाढाव्यानें विक्रीस काढले आहेत, त्यासाठी अर्ज बँकेस १५ डिसेंबर पूर्वी पोचले पाहिजेत. ह्या सेरीज, प्रत्येकीं ५० रु. चे २०,००० शेअर्स मुंबई सरकार घेणार आहे. त्यांची किंमत प्रत्येकी ५० रु.च आहे. वरील विक्रीस काढलेल्या शेअर्सपैकीं जे शिल्लक रहातील तेहि, परंतु एकूण कमाल २५ लक्ष रुपयांचे शेअर्स, सरकार घेईल. त्यांची किंमतहि प्रत्येकीं ५० रु.च तें देईल. ह्या शेअर्सना मतांचा अधिकार असणार नाहीं. त्यांवरील ३% डिव्हिडंड पेक्षां ज्यास्त डिव्हिडंडची रक्कम बँकेंतच बँकेच्या मालकीची राहील व ती "क्रेडिट स्टॅबिलायझेशन रिझर्व्ह"कडे वर्ग केली जाईल. शेअर्सवर १ जानेवारीपासून डिव्हिडंड सुरू होईल.

डायरेक्टर्सच्या निवडणुकीसाठी भागीदारांची खास साधारण सभा शनिवार, ता. १९ नोव्हेंबर रोजीं भरणार आहे.

## बँकिंगची संवय व बचत ह्यांचा प्रसार

### सहकारी संस्थांचें महत्त्वाचें स्थान

"खेडेगांवांतील जनतेंत बँकिंगच्या संवईचा प्रसार व्हावा आणि तेथील बचत एकत्रित करतां यावी ह्याविषयीं विचार करण्यासाठी भारत सरकार एक कमिटी नेमणार आहे. शेड्यूल्ड बँकांकडे ह्याबाबत विचारणा करण्यांत आली आणि त्यांनीं कांहीं अटींवर खेडेगांवांतून शाखा उघडण्याची तयारी दर्शविली असें समजतें. प्रांतिक सहकारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ह्यांच्या लहान शहरांतून व तालुक्याच्या ठिकाणीं शाखा आहेत आणि त्यांचा खेडुतांशी जिव्हाळ्याचा असा गेलीं कित्येक वर्षे संबंध आहे; तेव्हां खेडेगांवांपर्यंत मोहीम पोचविण्यास त्या फारच सोयीच्या संस्था आहेत. प्रारंभीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें कमिटी नेमली गेल्यास तिचेवर सहकारी बँका व सहकारी चळवळ ह्यांचे प्रतिनिधी घेतले जातील अशी आशा आहे." वरीलप्रमाणें मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें हिंदुस्थान सरकारच्या अर्थ खात्यास लिहिलें आहे.

## म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

### सरकारी कर्ज : व्यवस्थेची पुनर्घटना

रेशमाच्या बाजारपेठेतील मंदी १९४९ अखेर कायमच होती. परदेशी रेशमाच्या आयातीस सरकारनें बंदी केली, तरी अगोदरच आलेलें रेशीम कमी दरानेंच विकलें जात होतें. गेल्या दोन वर्षांतील नुकसानीमुळें कंपनीजवळ खेळतें भांडवल उरलें नाहीं आणि तिचे कारखाने अहवालाचे वर्षी बंद ठेवणें भाग पडलें. म्हैसूर सरकारनें कंपनीस ५ लक्ष रुपयांचें कर्ज नोव्हेंबर १९४८ मध्यें मंजूर केलें तें इनकमटॅक्सचे येणें वसूल करण्यासाठी सरकारनें ऑगस्ट १९४९ मध्यें वाढवून ८ लक्ष रु. केलें. मूळ कर्जाच्या परतफेडीस १९ वर्षे होतीं तीं आतां ८ वर्षे करण्यांत आलीं आहेत. कंपनीची मालमत्ता म्हैसूर सरकारकडे गहाण ठेवली आहे. कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीची (मेसर्स नाईक आणि कं.) मुदत संपली; तेव्हां म्हैसूर सरकारनें श्री. ए. सांबमूर्ति ह्यांस कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर नेमलें आहे. श्री. सांबमूर्ति हे पूर्वी कणकनहल्ली येथील सरकारी फिलेचर्सचे मॅनेजर होते. हिंदुस्थान सरकारनें रेशमाच्या धंद्यास भरपूर (३०% जकात + दर पौंडी १५ रु. १२ आ.) संरक्षण दिलेलें आहे. कंपनीस १९४८ सालीं २,८३,२८२ रु. तोटा झाला. पूर्वीच्या मॅनेजिंग एजन्सीचें प्रतिनिधी श्री. ना. गो. नाईक व श्री. जी. कृष्णस्वामी हे मॅनेजिंग एजन्सीची मुदत संपल्यामुळें डायरेक्टर बोर्डांतून गेले, परंतु त्यांस बोर्डानें को-ऑप्ट करून घेतलें. मेसर्स नाईक आणि कं.च्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख डायरेक्टर बोर्डानें आपल्या रिपोर्टांत केला आहे. कंपनीची वार्षिक सभा ३ नोव्हेंबर रोजीं झाली.

### जागतिक बँकेच्या इमारतींत व्यंगचित्रें

जागतिक बँकेच्या इमारतींत सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार मि. लो ह्यांच्या व्यंगचित्रांचें एक प्रदर्शन ठेवण्यांत आलें आहे. हीं व्यंगचित्रें जागतिक बँकेच्या नोकरवर्गाच्या मालकीचीं आहेत. जागतिक बँकेच्या नुकत्याच झालेल्या पहिल्या बैठकीच्या वेळीं निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं तीं पहाण्यांत कांहीं वेळ घालविला. त्यामुळें कामाला प्रारंभ होण्यास थोडासा विलंब लागला.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### १९४९ च्या सहकारी सप्ताहांत पुणें येथें झालेलीं व्याख्यानें

| दिनांक | व्याख्याते | विषय |
|---|---|---|
| रविवार ३०-१०-४९ | प्रो. एम्. आर. पाळंदे | स्वतंत्र भारतांत सहकारी चळवळीचें स्थान |
| सोमवार ३१-१०-४९ | रा. ब. जी. जी. शेंबेकर | युरोपमधील शेती, दुधदुभतें व सहकारी पद्धति |
| मंगळवार १-११-४९ | रा. ब. एन्. एस्. जोशी | सहकारी तत्त्वाधिष्ठित लहान-मोठ्या पाटबंधारा योजना |
| बुधवार २-११-४९ | श्री. व्ही. टी. शेट्ये | सहकारी ग्राहकसंघ |
| गुरुवार ३-११-४९ | श्री. एस्. एल्. ओगले | सहकाराचें तत्त्वज्ञान |
| शुक्रवार ४-११-४९ | प्रि. डी. आर. गाडगीळ | सहकारी शेतकी संघ |
| शनिवार ५-११-४९ | समारोप. अध्यक्ष : श्री. एम. आर. यार्दी, कलेक्टर. | |

### पुणें जिल्ह्यांतील आखलेला कार्यक्रम

| दिनांक | स्थळ | व्याख्याते |
|---|---|---|
| सोमवार ३१-१०-४९ | सणसर ता. बारामती | श्री. पां. तु. वेदक, श्री. य. धों. ओगले, श्री. वा. के. जोशी |
| गुरुवार ३-११-४९ | कासुर्डी ता. दौंड | श्री. एस्. आर. पाळंदे, श्री. शं. बा. इनामके, श्री. वि. ज. करंदीकर |
| ,, | भोसे ता. खेड | श्री. आर. वाय. बोरकर, श्री. जि. बा. काळे |
| ,, | वडगांव भिकार ता. जुन्नर | श्री. ग. र. तुळशीबागवाले, रा. सा. एन्. व्ही. भागवत, श्री. कु. बा. हुले |
| ,, | पळसदेव ता. इंदापूर | श्री. य. द. खोले, श्री. ज. द. वैद्य |
| शुक्रवार ४-११-४९ | रांजणगांव गणपती ता. शिरूर | श्री. मो. ना. पाटसकर, श्री. मा. धों. मगर |
| ,, | मंचर ता. आंबेगांव | श्री. बा. ज. मोहोनी, श्री. कु. बा. हुले |
| ,, | सासवड ता. पुरंदर | श्री. य. धों. ओगले, श्री. द. सो. टिळकर |

### सांगली स्टेट सें. को. बँकेची जत येथें शाखा

दि सांगली स्टेट सें को. बँक लि.नें जत येथें बुधवार ता. २६ ऑक्टोबर रोजीं पांडव पंचमीचे दिवशीं आपली शाखा उघडली. त्यावेळीं धार्मिक विधीचा समारंभ होऊन पानसुपारीचाहि समारंभ झाला. जत शाखेचा पत्ता "श्री. बापूराव अरळी ह्यांची पेठेतील जागा, जत" असा आहे.

### पूना पोस्टल को. बँकेची देणगी

ता. २-१०-१९४९ रोजीं पूना पोस्टल को. बँकेच्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्यें सभासदांनीं एक टका डिव्हिडंड कमी करून रु. ४०१ पुणें युनिव्हर्सिटीस देणगी द्यावी, असा एकमतानें ठराव मंजूर केला.





'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

भोर स्टेट बँक लि.

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. घंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.








हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.